# उपनिबंधक, सहकारी संस्था, आर-नॉर्थ-विभाग, मुंबई, यांचे कार्यालय

३०३ अे विंग, ३ रा मजला, बी.एम.सी. गोडाऊन इमारत, संस्कृती कॉम्प्लेक्स, ९० फीट रोड,
कांदिवली (पू) मुंबई -४०० १०१.

## महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७(अ) अन्वये आदेश

जा.क्र.मुंबई/उपनि/आर-नॉर्थ वि/सि.गो.को.हौ./४३६८/२०१८
दिनांक - 23 / 9 /२०१८

वाचावे - १) संस्थेचे अध्यक्ष यांचे दि.१३/१२/२०१७ रोजीचे पत्र.

२) या कार्यालयाचे दि.१५/०१/२०१८ रोजीचे सुनावणी नोटीस.

३) संस्थेचा दि.२०/०१/२०१८ रोजीचा लेखी खुलासा

३) महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) अधिनियम १९६० चे कलम ७७ (अ) मधील तरतूद

ज्याअर्थी, सिल्व्हरगोल्ड अपार्टमेंटस को-ऑप.हौ.सो.लि., एस.व्ही.पी.रोड, बोरीवली (प) मुंबई-९२ ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ९ अन्वये नोंदविण्यांत आलेली आहे. आणि,

ज्याअर्थी सिल्व्हरगोल्ड अपार्टमेंटस को-ऑप.हौ.सो.लि., एस.व्ही.पी.रोड, बोरीवली (प) मुंबई-९२ (यापुढे संस्था असे वाचावे) या संस्थेचे कामकाज महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० (यापुढे अधिनियम असे वाचावे), महाराष्ट्र सहकारी संस्थांचे नियम १९६१ (यापुढे नियम असे वाचावे), व संस्थेच्या नोंदणीकृत उपविधी व शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय व परिपत्रकामधील तरतूदीस अनुसरुन कामकाज करणे आवश्यक आहे. आणि,

ज्याअर्थी, वरील संस्था बृहन्मुंबईच्या आर विभागात कार्यरत असल्याने त्या संस्थेचे निबंधक, उपनिबंधक, सहकारी संस्था, आर-नॉर्थ विभाग, मुंबई हे आहेत आणि,

ज्याअर्थी, सिल्व्हरगोल्ड अपार्टमेंटस को-ऑप.हौ.सो.लि., एस.व्ही.पी.रोड, बोरीवली (प) मुंबई-९२ या संस्थेचे चेअरमन श्री भरत एम.शहा यांनी त्यांचे दि.१३/१२/२०१७ रोजीचे पत्राने या कार्यालयात कळविण्यात आले आहे. की, संस्थेचे सचिव , खजिनदार व एक समिती सदस्य यांनी दि.१५/११/२०१७ रोजी संस्थेचे अध्यक्ष या नात्याने संस्थेचे काही सभासद हे संस्थेच्या उपविधी अन्वये काम करण्यास सहकार्य करीत नसल्यामुळे संस्थेचे पदाधिकारी यांनी राजीनामे दिले आहेत. परंन्तु त्यांच्याशी संपर्क साधून चर्चा करून सुध्दा ते संस्थेचे कामकाज करणेस तयार नाही. त्यामुळे संस्थेचे दैनंदिन कामकाज बंद पडले आहे. ज्या पदाधिकाऱ्यांनी त्यांचे पदाचे राजीनामे दिले आहे. त्याबाबत त्यांना समजून सांगुन सुध्दा ते त्यांचे राजीनामे मागे घेणेस तयार नाही. तसेच संस्थेची व्यवस्थापक समिती हे ६ व्यक्तींची असल्याने कोरम अभावी त्यांचे राजीनामे मंजूर करता येत नाही. त्यामुळे सदर बाबीवर साधक बाधक विचार करून अर्जदार श्री भरत एन. शहा यांनी अध्यक्ष पदाचा सुध्दा राजीनामा देवून त्यांनी व इतर समिती सदस्यांचे राजीनामे या कार्यालयात सादर करून पुढील कार्यवाही साठी या कार्यालयाच्या निदर्शनास आणून दिले आहे. आणि,

ज्याअर्थी संस्थेचे पदाधिकारी यांना त्यांचे लेखी म्हणणेसह या कार्यालयात सुनावणीस उपस्थित राहणेबाबत कळविण्यात आले असता सदर दिवशी संस्थेच्या वत्तीने कोणीही उपस्थित राहीले नाही. परंन्तु त्यांनी त्यांचे दि.२०/०१/२०१८ रोजी टपालव्दारे या कार्यालयास लेखी खुलासा सादर केलेला असता सदरचा खुलासा पहाता त्यामध्ये असे नमुद केले आहे की, संस्थेचे कोणीही पदाधिकारी संस्थेचे कामकाज करणेस इच्छित नाही आणि, सदर संस्थेच्या व्यवस्थापक समितीवर योग्यती कार्यवाही. करणेस याकार्यालयास कळविले आहे. आणि

OFFICE OF THE DEPUTY REGISTRAR C.S R NORTH WARD MUMBAI

Scanned by CamScanner

त्याअर्थी वरील वस्तुस्थिती पहाता संस्थेच्या समिती पदाधिकारी व समिती सदस्यांनी त्यांचे राजीनामे दिले असल्याने व्यवस्थापक समितीच्या गणपूर्ती पूर्ण होणेस अभाव निर्माण झाल्याने समितीच्या रचनेत दोष निर्माण झाला आहे. संस्थेच्या व्यवस्थापक समितीने त्यांचे कार्य करण्यांचे बंद केल्यामुळे संस्थेच्या व्यवस्थापनामध्ये पोकळी निर्माण झाली आहे. त्यामुळे संस्थेचे सभासद यांचे हित जोपासण्यासाठी व संस्थेचे दैनंदिक कामकाज पहाणेसाठी प्राधिकृत अधिकारी यांची नियुक्ती करणे अनिवार्य आहे. त्यामुळे संस्थेचे सभासद यांचे हित संबंधात बाधा निर्माण होणार नाही. या दृष्टीकोणातुन संस्थेचे दैनंदिक कामकाज पहाणेसाठी प्राधिकृत अधिकारी यांची नियुक्त करणे विधीग्राहय व अनिवार्य असलेबाबत माझी खात्री झाल्यांने त्याअनुषंगाने खालीलप्रमाणे आदेश निर्गमित करणेत येत आहे.

## आदेश

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ (अ) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी सं. वि.निकम उपनिबंधक, सहकारी संस्था, आर-नॉर्थ विभाग, मुंबई याद्वारे सिल्व्हरगोल्ड अपार्टमेंदस को-ऑप.हौ.सो.लि., एस.व्ही.पी.रोड, बोरीवली (प) मुंबई-९२ या संस्था समितीने कामकाज बंद केल्याने व व्यवस्थापनात पोकळी निर्माण झालेने संस्थेचे दैनंदिन कामकाज पहाणे श्री प्रकाश आर.चव्हाण प्रमाणित लेखापरिक्षक यांची प्राधिकृत अधिकारी म्हणून नियुक्त करीत आहे.

सदरचा आदेश आज दि.२३/०७/२०१८ रोजी माझी सही व या कार्यालयाच्या मुद्रेसह दिला असे.

(सं.वि.निकम)
उपनिबंधक
सहकारी संस्था, आर-नॉर्थ विभाग, मुंबई

प्रत: -

१) चेअरमन/सेक्रेटरी, सिल्व्हरगोल्ड अपार्टमेंटस को-ऑप.हौ.सो.लि., एस.व्ही.पी.रोड, बोरीवली (प) मुंबई-९२
२) श्री प्रकाश आर.चव्हाण प्रमाणित लेखापरिक्षक तथा प्राधिकृत अधिकारी सिलव्हरगोल्ड अपार्टमेंटस को-ऑप.हौ.सो.लि., एस.व्ही.पी.रोड, बोरीवली (प) मुंबई-९२
३) अध्यक्ष/सचिव, मुंबई जिल्हा सहकारी गृहनिर्माण संस्था संघ मर्या., १०३, विकास प्रिमायसेस, पहिला मजला,११ एन. जी. एन.विदया मार्ग, फोर्ट मुंबई-४०० ००१.
४) व्यवस्थापक, मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित/महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि., शाखा बोरीवली / दहिसर (पूर्व ) (पश्चिम )यांचेकडे माहितीसाठी व पुढील आवश्यक त्या कारवाईसाठी सस्नेह रवाना.
५) संग्रह

उपनिबंधक
सहकारी संस्था, आर-नॉर्थ विभाग, मुंबई

Scanned by CamScanner